# University of Pune

*Telephone Nos.*
020 - 25601131, 25601391
25601147, 25601150
25601133, 25601135
25601136

**EXAMINATION SECTION**
**Ganeshkhind, PUNE-411007, INDIA.**
*Telegraph* : **'UNIPUNE'**
*Fax* : **020-25601131**
Website : www.unipune.ernet.in
e-mail : coe@unipune.ernet.in

संदर्भ क्र. पुवि/परीक्षा/२१

दिनांक . ९/७/२०१२

प्रति,

मा,प्राचार्य/मा.संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,

<u>विषय</u> . विद्यार्थ्यांच्या विविध तक्रारींसंदर्भात...

महोदय,

मार्च/एप्रिल-मे,२०१२ मध्ये पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध परीक्षांचे निकाल जाहीर झालेले आहेत. काही परीक्षांचे निकाल जाहीर होत आहेत. परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर निकाल विद्यापीठाच्या संकेत स्थळावर महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन दिले जातात. संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या निकालांमध्ये काही त्रुटी आढळून आल्यास विद्यार्थ्यांनी त्यांच्या त्रुटीसंदर्भातील तक्रारी मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरीने महाविद्यालयाच्या प्रतिनिधींमार्फत विद्यापीठाकडे पाठवावयाचे आहेत.

ज्या विद्यार्थ्यांना फेरतपासणी व पुर्नःमूल्यांकनासाठी अर्ज सादर करावयाचे आहेत त्यांनी अर्ज महाविद्यालयामार्फत गुणपत्रिका मिळाल्या- पासून १० दिवसांपर्यंत पाठवावेत. महाविद्यालयाने अर्ज पुणे विद्यापीठाकडे पाठविताना त्यासंबंधीची सर्व प्रक्रिया पूर्ण करुनच पाठवावे.

वरील संदर्भात सर्व मा.प्राचार्य व मा.संचालक यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी कृपया वरील बाबींची तंतोतंत कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी व पुणे विद्यापीठास सहकार्य करावे. तसेच विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठाकडे पाठवू नये ही विनंती.

कळावे,

आपला,
९/७/१२
उपकुलसचिव
(छाननी व तालिनीकरण विभाग.)

*ak/Sathe Sir's Docu/१*